





PRATHAM BOOKS

वाचन पातळी ४


# आमची बा

**Author:** Subhadra Sen Gupta
**Illustrators:** Chaaya Prabhat, Neeta Gangopadhya
**Translator:** Mukund Taksale

**आमची बा**

महात्मा गांधींच्या अनेक छायाचित्रांत आपल्याला त्यांच्या मागे त्यांच्या उजव्या बाजूला एक  छोट्या चणीची, नाजूक स्त्री बसलेली दिसते. अंगावर खादीची साडी, डोक्यावरून पदर घेतलेला. त्यांना ओळखणाऱ्या लोकांना ठाऊक होतं की त्या अबोल आहेत. पण हेही खरं की हा चेहरा एकदा पाहिला तर विसरणं कठीण.

त्यांचं नाव कस्तुरबा. मोहनदास करमचंद गांधी यांच्या त्या पत्नी.



त्यांचं शिक्षण फारसं झालेलं नव्हतं आणि तशा त्या वागण्यातही फार आधुनिक नव्हत्या. पण त्यांना एक कणखर व्यक्तिमत्त्व होतं. त्यांच्या साधेपणामुळे आणि दयाळूपणामुळे त्या लोकांना आपल्या वाटत. त्या एकाच वेळी पत्नी होत्या, आई होत्या, आजी होत्या, मैत्रीण होत्या आणि स्वातंत्र्य सैनिकही होत्या.

इंग्रज अधिकारी त्यांना ‘मादाम गांधी’ म्हणत, पण भारतीय जनतेच्या मात्र त्या ‘बा’ होत्या, लाडक्या आई होत्या. गांधीजीसुद्धा त्यांना त्याच नावानं संबोधायचे.



स्वातंत्र्य लढा, निषेध मोर्चा, सत्याग्रह आणि उपोषणं या साऱ्या धामधुमीत तर त्या गांधींजीच्याही ‘नेत्या’ असत. गांधीजींच्या विश्वाचा त्या स्थिर केंद्रबिंदू होत्या. त्यांचा पाठिंबा नसता तर गांधीजींना एवढं यश मिळणं कठीण होतं.

पण त्याखेरीज बा स्वत:चं असं व्यक्तिमत्त्व असणारी स्वतंत्र स्त्री होती. गांधीजींप्रमाणे त्या कणखर, धाडसी, व्यवहारी होत्या. देशासाठी त्यांनी खूप सोसलं, खूप त्याग केला. त्या स्वातंत्र्यसैनिक होत्या. त्यांनी निषेध मोर्चाचं नेतृत्व केलं. पोलिसांचा लाठीमार सोसला आणि तुरुंगवासही पत्करला. गांधीजींचा साबरमती आश्रम चालवण्याची जबाबदारी त्यांच्यावरच होती आणि स्वातंत्र्यलढ्यातल्या साऱ्या नेत्यांसाठी आश्रमाची दारं कायम उघडी असत. स्वातंत्र्यलढ्यातील प्रत्येक सैनिकाशी - मग तो तरुण असो वा वृद्ध - त्या समजूतदार आणि समंजस मित्राच्या भूमिकेत वावरत.

महात्मा गांधी जसे लोकांसाठी ‘बापू’ किंवा वडील होते, तशाच कस्तुरबा या लोकांसाठी आई होत्या, ‘बा’ होत्या. दोघंही एकमेकांना साजेसेच होते.

## साबरमती आश्रम

साबरमती आश्रमात कस्तुरबा आणि गांधीजी यांच्याभोवती कायम लहान मुलांचं कोंडाळं असे. त्यांना ‘वानर सेना’ म्हटलं जाई. गांधीजींनी त्यांना भाज्यांची लागवड करायला, आश्रमातल्या गाई आणि शेळ्या यांची राखण करायला आणि चरख्यावर सूत काढायला शिकवलं होतं. आश्रमात एकदा सूतकताईची स्पर्धा होती. सर्वांत जास्त सूत कोण काढतो याची आणि आश्रमातल्या त्यांच्या एका चिमुरड्या नातीनं बा आणि बापूंना चक्क हरवलं की!

गांधीजींनी मुलांना कस्तुरबांचं ऐकायचं असं सांगितलेलं होतं. ‘मी कसा ऐकतो तसं तुम्ही ऐकायचं कारण मला बांची भीती वाटते’ असं ते मुलांना गमतीनं म्हणायचे. एकदा मजाच झाली. दुपारी सर्वांची जेवणं झाल्यावर बा थोडी झोप काढण्यासाठी निघून गेल्या. तेवढ्यात आश्रमात पाहुणे आले. गांधीजींना त्यांच्या जेवणाची व्यवस्था करायची होती. पण बांना तर उठवायचं नव्हतं. मग त्यांनी मुलांना स्वयंपाक करायला सांगितला. ‘मात्र बिल्कुल आवाज न करता, कस्तुरबांची झोपमोड न करता, अगदी शांतपणे’, मुलांना एवढं बजावून ते हळूच तिथून पसार झाले. इकडे एका मुलाच्या हातून पितळ्याची थाळी खाली पडली आणि खण्णऽऽ असा जोरदार आवाज झाला.

बा उठल्या. स्वयंपाकासाठी आपल्याला का कुणी उठवलं नाही, हे त्यांना समजेनाच. बापूंना वाटलं ते बांच्या रागापासून दूर पळाले. पण तसं झालं नाही. त्या बापूंना शोधत त्यांच्या प्रार्थना-सभेत आल्या आणि तिथं अनेक लोकांसमोर त्यांनी बापूंना चांगलं फैलावर घेतलं.



## बालिका वधू

कस्तुरबाई माखनजी हिचा जन्म ११ एप्रिल १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. तिच्या वडिलांचं नाव होतं गोकुळदास माखनजी आणि आईचं नाव होतं विराज कुँवर बा. आपल्याला कस्तुरबाईच्या बालपणाविषयी फार थोडी माहिती मिळते. तिचे वडील हे चांगले व्यापारी होते आणि त्यामुळे कस्तुरबाईचे बालपण चांगल्या सुखवस्तू घरात गेले. गोकुळदासांचे जवळचे मित्र होते करमचंद गांधी. दोघा मित्रांनी करमचंद यांच्या सर्वांत धाकट्या मुलाशी - मोहनदासशी कस्तुरबाईचं लग्न लावायचं ठरवलं.

दोघांचा साखरपुडा झाला तेव्हा मुलगा आणि मुलगी दोघंही सात वर्षांचे होते. नेमकं सांगायचं झालं तर छोटया मोहनदासचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी झाला होता आणि तो बायकोपेक्षा वयाने थोडा लहानच होता. हुशार आणि स्वावलंबी असणारी कस्तुरबाई मोहनदासला कायम वयाने मोठी असल्याचे जाणवून द्यायची.

१८८२ साली, दोघं तेरा वर्षांचे असताना त्यांचं लग्न झालं आणि कस्तुरबाई गांधी कुटुंबात नांदायला आली. करमचंद हे पोरबंदरच्या राजाचे दिवाण किंवा पंतप्रधान होते आणि त्यामुळे घरची परिस्थिती चांगली होती. करमचंद आणि पुतळाबाई हे एकत्र कुटुंब चालवत होते. पुतळाबाई ही तिच्या धाकट्या मुलाप्रमाणेच धार्मिक वृत्तीची आणि दयाळू आणि प्रेमळ अशी स्त्री होती.



मोहनदास शाळेत जाऊ लागला. त्या काळात मुली फारशा शिकत नसत त्यामुळे कस्तुरबाला लिहिता वाचता येत नव्हतं आणि तिला शिक्षणात फारशी गोडी वाटायची नाही. मोहनदास तिला शिकवायचा आटोकाट प्रयत्न करायचा म्हणून ती गुजराती शिकली, पण इंग्रजी शिकायला मात्र ती तयार झाली नाही. दोघे सत्तर वर्षांचे असताना आगाखान पॅलेसमध्ये दोन वर्षं तुरुंगवासात होते. तिथे गांधीजी कस्तुरबांना भूगोल शिकवण्यासाठी जंग जंग पछाडायचे आणि त्या त्यांना अजिबात दाद द्यायच्या नाहीत.

मोहनदास पुढे एके दिवशी 'महात्मा गांधी' झाले. स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांचा शूर नेता अशी त्यांची ख्याती झाली. पण वयाच्या तेराव्या वर्षी छोटा मोहनदास काही एवढा शूर नव्हता.



तो कमालीचा लाजाळू, अंधारात झोपायला घाबरणारा आणि भुताखेतांना तसेच सापांना घाबरणारा असा भेदरट पोरगा होता. या उलट कस्तुरबा ही कशालाच न घाबरणारी. तिच्या नवऱ्यानं दांडगाई केली, दादागिरी केली तर त्यालाही ती बिलकूल घाबरत नव्हती. मोहनदासला वाटायचं आपल्या बायकोनं बाहेर मित्र-मैत्रिणींबरोबर खेळायला जाताना आपली परवानगी घ्यावी. कस्तुरबा नवरोबाकडे दुर्लक्ष करून तिला जे मनाला वाटायचं तेच करायची.

‘कस्तुरबांनी जीवनभर आपल्या लोकप्रिय नवऱ्याला खंबीरपणे साथ दिली. हा नवरा स्वत:चं तेच खरं करणारा होता. पण पहिल्यांदा तिला एखादी गोष्ट पटवून दिल्याखेरीज ती त्यांचं ऐकायला तयार व्हायची नाही. ती गोष्ट पटली नाही तर विरोध न करता ओठ मिटून खंबीरपणे शांत उभी राहायची. गांधीजी म्हणतात, सत्याग्रहाचे पहिले धडे ते आपल्या कणखर आणि खंबीर बायकोपासून शिकले. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या मुळाशी सत्याग्रह आणि अहिंसा ही दोन तत्त्वे होती. सत्याग्रह म्हणजे सत्यासाठी उभारलेला लढा आणि तो अहिंसेच्या मार्गाने द्यायचा. त्यांनी म्हटलं आहे, ‘तिनं मला तिच्या वागण्यानं अक्षरश: लाजवलं आणि ‘मी तिच्यावर अरेरावी करण्यासाठीच जन्माला आलेलो आहे’ या माझ्या मूर्ख विचारातून मला बाहेर काढलं. अखेरीस ती माझी अहिंसेतील गुरू ठरली.’

१८८६ साली, कस्तुरबा सतरा वर्षाची असताना हरिलालचा जन्म झाला. लगेचच मोहनदास कायद्याच्या उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला रवाना झाला आणि तो पाच वर्षांनी परतला. तो परत आला आणि त्याने राजकोटमध्ये वकिली सुरू केली. तिथे १९९२ साली त्यांचा दुसरा मुलगा मणीलाल जन्मला. या तरुण वकिलाची वकिली फारशी बरी चाललेली नव्हती. याला कारण तो अजूनही लाजाळू होता आणि वकिली करताना इतका नर्व्हस व्हायचा की न्यायाधीशांसमोर बोलताना बऱ्याचदा त्याची बोलतीच बंद व्हायची. १८९३ मध्ये नशिबाने त्याला दक्षिण आफ्रिकेतून एका नोकरीसाठी विचारणा झाली. मोहनदास पुन्हा एकदा आपलं कुटुंब मागे ठेवून दरबानला रवाना झाला. नंतर तीन वर्षांनंतर तो आपल्या कुटुंबाला घेऊन जाण्यासाठी परत आला.

वयाच्या सव्विसाव्या वर्षी दोन मुलांची आई असणारी कस्तुरबा मुंबईहून एका परक्या देशात जाण्यासाठी म्हणून बोटीत बसली. आपण लगेचच भारतात परत येऊ असं तिला वाटलं असेल पण नंतर तब्बल अठरा वर्षांनंतर ती भारतात परतली. दक्षिण आफ्रिकेतला हा काळ जसा खूप सुखाचा होता तसाच लढ्याचा आणि त्यागाचाही होता. तिचा तो वाढीचा काळ होता. ती मोठी झाली, बदलली आणि स्वातंत्र्य सेनानी झाली.

## खाण्यापिण्यातील चमत्कारिकपणा आणि उपवास

आपण काय खातो, याविषयी गांधीजी बरेच चिकित्सक होते. ते खाण्याबाबत सतत प्रयोग करत राहायचे. ते शाकाहारी होते आणि नेहमी ते जेवणात चपात्या, भाज्या, डाळी, फळं आणि शेंगदाणे खायचे. पण त्यांचे प्रयोग चालूच असत. ते काही ते थांबवत नसत.

एक दिवस फक्त शेंगदाण्यावरच राहायचं असं ठरवलं. तर दुसऱ्या दिवशी त्यांनी तेल आणि मसाले न घालता पदार्थ बनवायला सांगितले आणि आपल्या रोट्या कडूलिंब आणि लसणाच्या भयानक चटणीबरोबर खायचं ठरवलं. साबरमती आश्रमाच्या स्वयंपाकघराचा ताबा कस्तुरबांकडे होता आणि त्यांच्यासाठी हे प्रयोग म्हणजे प्रचंड डोकेदुखी होती.



बायकांना स्वयंपाकघरात फार काळ काम करावं लागू नये म्हणून एकदा त्यांनी कच्चाच आहार घ्यायचा ठरवला. ते आणि त्यांचे काही अनुयायी कच्च्या भाज्या आणि फळंच खाऊ लागले. त्यांच्या जेवणात मोड आलेले गहू, पालक, मनुका असायच्या. शेंगदाणे आणि मध यांच्या चटणीबरोबर ते हे सारं खायचे. आणि या बरोबर ते लिंबूपाणी आणि नारळपाणी प्यायचे. हे सारं तयार करण्याची जबाबदारी बिचाऱ्या कस्तुरबांवर यायची. काही दिवसांतच ते सारे अगदी अशक्त झाले आणि त्यांना हगवणीचा त्रास सुरू झाला. आणि तो प्रयोग गांधीजींनी आवरता घेतला आणि अखेर कस्तुरबांची त्यातून सुटका झाली.

गांधीजी उपोषणाला बसले की कस्तुरबांना फार काळजी वाटायची. त्यांनी उपोषणाला बसू नये म्हणून त्या गांधीजींना विनवणी करायच्या. नंतर एकदा त्यांनी ‘गाईचं दूध पिणार नाही’ असा निश्चय केला. एकदा ते आजारी पडले असताना डॉक्टरांनी त्यांना दूध घ्यायला सांगितलं पण त्यांनी नकार दिला आणि ते कुणाचंच ऐकायला तयार नव्हते. अखेर कस्तुरबांनी त्यांना शेळीचे दूध पिण्यासाठी राजी केलं. मध्येच कधी तरी गांधीजींनी जेवणातल्या खाद्यपदार्थांत मीठ घालायचं नाही, असं ठरवलं. पण दांडी यात्रा काढून त्यांनी जेव्हा याच मिठासाठी सत्याग्रह केला, तेव्हा कस्तुरबांना गालातल्या गालात हसू फुटलं.

नवऱ्याच्या खाण्यापिण्याच्या असल्या चमत्कारिक वागण्याला कस्तुरबा फारशा महत्त्व देत नसत. गांधीजींना लोकांनी चहा किंवा कॉफी पिणं हे आवडायचं नाही. पण कस्तुरबा मात्र चहा-कॉफी पिण्यातला आनंद लुटायच्या. गांधीजींनी एकदा तशी कबुलीच दिली, 'माझ्याबरोबर राहत असूनही बा चहा घेते. ती कॉफीपण घेते आणि कधी मी तिला प्रेमाने चहा किंवा कॉफी बनवून देतो.'



## परक्या मुलखात

कस्तुरबांचं आजवरचं आयुष्य हे आपल्या कुटुंबीयांसमवेत सुरक्षित आणि बिनत्रासाचं गेलं होतं. त्यांच्यासाठी दक्षिण आफ्रिकेतील डर्बन ही जागा फारच परकी, चमत्कारिक आणि घाबरवणारी होती. दक्षिण आफ्रिकेतील समाज खोलवर दुभंगलेला समाज होता. तिथं राज्य गोऱ्यांचं होतं आणि त्यांनी आफ्रिकन आणि भारतीय यांना मजुरांच्या पातळीवरच ठेवलेलं होतं. तिथले भूमिपुत्र होते आफ्रिकन आणि तिथल्या शेतावर मजूर म्हणून राबण्यासाठी भारतीय गेलेले होते. तिथले बहुसंख्य लोक आफ्रिकन होते पण त्यांना आणि भारतीयांना कोणतेही हक्क नव्हते.

तिथे गोरे सर्वसत्ताधीश होते आणि आफ्रिकनांना आणि भारतीयांना सतत गोऱ्या हिंसक पोलिसांना तोंड द्यावं लागायचं.
क्षुल्लक कारणावरून ते त्यांना बडवायचे आणि खटला न चालवताच त्यांना तुरुंगात डांबून टाकायचे. 'अपारथाईड' (Apartheid) नावाचा वंशभेदावर आधारित एक कायदाच त्यांनी केला होता. हा कायदा असल्याने भारतीयांना आणि आफ्रिकनांना तिथे मुक्तपणे फिरता येत नव्हतं. किंवा मालमत्ता करता येत नव्हती. त्यांना हॉटेलांमध्ये, दुकानांत किंवा रुग्णालयांत अशा अनेक जागी प्रवेश करण्यास बंदी होती. त्यांच्यासाठी पाणी पिण्याचे नळसुद्धा वेगळे होते. समोरून गोरा माणूस जर येत असेल तर त्यांना पदपथावरून खाली उतरावं लागे. एकदा हे करायचं नाकारलं, म्हणून गांधीजींनाही मार खावा लागला होता.




दक्षिण आफ्रिकेतील हा वंशभेद पाहून गांधीजींना धक्काच बसला. एखाद्याच्या रंगावरून भेदभाव करण्याची ही वृत्ती लंडनमध्येसुद्धा त्यांनी पाहिली नव्हती. हळूहळू त्यांनी भारतीय मजुरांना मदत करायला सुरुवात केली. हे मजूर शेतावर काम करायचे, पण त्यांना योग्य मजुरी दिली जायची नाही आणि मालकाकडून मारहाण व्हायची. गांधीजी त्यांची बाजू घेऊन कोर्टात लढले आणि त्यांना वेठबिगारीतून मुक्त करण्यात यशस्वी ठरले. भारतीय मजुरांमध्ये - ज्यांना 'कुलीज्' म्हटलं जायचं - त्यांच्यात गांधीजी लोकप्रिय झाले आणि त्यांना लोक 'कूली बॅरिस्टर' म्हणून ओळखू लागले.

आपल्या कुटुंबाला घेऊन जाण्यासाठी गांधीजी जेव्हा भारतात आले तेव्हा भारतात त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील अनुभवांवर लेख लिहिले, भाषणं दिली. त्यात त्यांनी अपारथाईडसारख्या अमानुष कायद्यावर टीका केली. जेव्हा या भाषणांच्या बातम्या दक्षिण आफ्रिकेतील वृत्तपत्रांत छापून आल्या तेव्हा गोरे लोक खवळले. त्यांनी गांधीजींना दक्षिण आफ्रिकेत पाऊल टाकू द्यायचं नाही आणि डर्बनमधून पिटाळून लावायचं, असं ठरवलं. गांधीजी जहाजात बसून दक्षिण आफ्रिकेत यायला निघाले तेव्हा त्यांना याबद्दल काहीच ठाऊक नव्हतं. त्यांच्याबरोबर अनेक भारतीय होते. डर्बन बंदरावर जहाज आल्यावर अधिकाऱ्यांनी त्यांना जहाज सोडायला परवानगी दिली नाही. असं करण्याचं कारण मात्र त्यांनी वेगळंच सांगितलं - जहाजातल्या भारतीयांना प्लेग झालेला आहे, असं ते म्हणाले.

प्रवाशांना खाली उतरण्याची परवानगी न देता तब्बल तेवीस दिवस जहाज बंदराबाहेर थांबवून ठेवलेलं होतं. संतप्त गोऱ्या लोकांचा मोठा जमाव बंदरावर जमलेला होता आणि तो गांधीजींच्या विरोधात घोषणा देत होता. भारतीयांना जहाजातून उतरू देणंच गोऱ्यांना मान्य नव्हतं. ते त्या भारतीयांना जोरजोरात घोषणा देऊन ‘भारतात परत जा’ असं सांगत होते.


बिचाऱ्या कस्तुरबाला काय वाटलं असेल, याची कल्पना केलेलीच बरी! पहिल्यांदा तिला आपल्या पतीच्या आणि मुलांच्या जिवाची भीती वाटली आणि ही भीती उराशी बाळगूनच ती उरलेलं आयुष्य जगली.



गांधीजींचे काही मित्र बोटीवर आले आणि म्हणाले, ''रात्र झाली की अंधारात जहाजातून खाली उतरता येईल.'' पण गांधींजींना असं भेदरटासारखं पळून जाणं मान्य नव्हतं. त्यांनी कस्तुरबा आणि आपल्या मुलांना इतरांबरोबर एका पारशी उद्योजक मित्राच्या घरी पाठवून दिलं आणि नंतर दिवसाढवळ्या शांतपणे प्रक्षुब्ध लोकांसमोरच ते जहाजातून खाली उतरले आणि रुस्तमजींच्या घरी ते चालत निघाले.

गोऱ्या लोकांनी त्यांना अचानक घेरलं आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. पोलिस सुपरिटेन्डेन्टची पत्नी जेन अलेक्झांडर तिथे होती. ती मध्ये पडली म्हणून बरं, नाही तर गांधीजी त्या मारहाणीत मेलेच असते!

गांधीजी आपल्या कुटुंबाला नंतर भेटले पण त्यांच्यामागचा त्रास काही कमी झाला नाही.



आता जमाव त्यांच्या घराभोवती जमून त्यांच्याबद्दल वाईट-साईट बोलत असे, त्यांना ‘बाहेर या’ अशा घोषणा जोरजोरात ओरडून ऐकवत असे. एकदा पोलिसांनी त्यांना पोलिस शिपायाचा गणवेश घालून गुपचूप घराबाहेर काढलं. नंतर जेव्हा गोऱ्यांचा जमाव आत घुसला तेव्हा त्यांना फक्त रुस्तमजींचं कुटुंब, कस्तुरबा आणि मुलं दिसली.

कस्तुरबा खूपच घाबरल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेत हे असं ‘नाट्यपूर्ण’ स्वागत त्यांच्या वाट्याला आलं. कस्तुरबांच्या जागी दुसरी कुणी बाई असती तर तिनं लगेचच भारतात घरी परतायचा निर्णय घेतला असता, पण कस्तुरबांनी तसं केलं नाही.



गांधीजी वकील म्हणून यशस्वी झाल्यावर परिस्थिती बदलत गेली आणि नंतर ते समुद्र किनाऱ्यावरील मोठ्या घरी राहू लागले. कस्तुरबांनी भरतकाम केलेली भारीपैकी साडी घातलेली आहे. मुलं आणि गांधीजी हे पाश्चात्त्य पोशाखात आहेत, अशी त्या काळची छायाचित्रं उपलब्ध आहेत.


गांधीजींना स्वत:च्या जीवनाविषयी सतत प्रयोग करावेसे वाटत आणि त्यामुळे हीही परिस्थिती लगेचच बदलली आणि ते सारे एका शेतावर राहू लागले. कारण गांधीजींना अत्यंत साधं राहण्याची इच्छा होती.
पहिल्यांदा डर्बनजवळील फिनिक्स फार्म आणि नंतर जोहानिसबर्गजवळील टॉलस्टॉय फार्म. अनेक लोक येऊन त्यांच्या कार्यात सहभागी झाले.

इथे नियम असा होता की सर्व कामं ही त्या शेताच्या वस्तीवर राहणाऱ्या सभासदांनीच करायची. आपणच भाज्या लावायच्या, गाईचं दूध काढायचं, स्वयंपाक, धुणं, स्वच्छता करायची. ते स्वत: पाव भाजायला, मुरांबा तयार करायला, सुतारकाम करायला आणि बूट शिवायलाही शिकले. ते सारं पर्यावरणाला पोषक होतं पण त्यात कष्ट खूपच करावे लागत होते. त्यांनी मुलांना शाळेतून काढलं आणि स्वत:च घरी शिकवायचा निर्णय घेतला. कस्तुरबांच्या मनाला हे फारच लागलं. त्यांचा थोरला मुलगा हरिलाल याला हे अचानक केलेले इतके महत्त्वाचे बदल मान्य नव्हते, त्यामुळे त्यानं गांधीजींविरुद्ध उघडपणे बंडखोरी पुकारली. त्यानं लवकरच घर सोडलं आणि तो भारतात परत गेला. त्याचं आणि गांधीजींचं पुढे कधीच जुळलं नाही.

बिचाऱ्या कस्तुरबांना हे सारं अती व्हायचं.
असाच रागावण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. गांधीजींनी प्रत्येकाला आश्रमातले संडास साफ करावे लागतील, असं जाहीर केलं. कस्तुरबांना हे मान्य नव्हतं. त्यांचं गांधीजींशी मोठं भांडण झालं. अखेरीस नेहमीप्रमाणे त्यांनी माघार घेतली. पण या प्रसंगापासून त्यांचं जीवन म्हणजे अहोरात्र कष्ट आणि लोकसेवा हेच राहिलं. पुढे गांधीजींनी अहमदाबादला साबरमती आश्रम काढल्यानंतर तिथेही कस्तुरबांनी हीच भूमिका स्वीकारली. त्या अत्यंत साधेपणाने राहायच्या. त्यांच्या मालकीच्या अशा इतक्या थोड्या वस्तू होत्या की त्यांची प्रवासाची बॅगसुद्धा नवऱ्याच्या बॅगेपेक्षा छोटी होती.

काळात गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या हक्काविषयी लढा सुरू केला होता आणि त्यासाठी त्यांनी ‘नाताळ इंडियन कॉंग्रेस पार्टी’ची स्थापना केली होती.
ते निषेधाचे मोर्चे काढायचे, मग गांधीजींसकट अनेकांना अटक व्हायची आणि तुरुंगात भरती केलं जायचं.

तुरुंगात त्यांची उपासमार व्हायची, फटके मारले जायचे आणि काही वेळा त्यांना अंधारकोठडीतही डांबण्यात यायचं. भारतातल्या आणि ब्रिटनमधल्या वर्तमानपत्रांत यावर बरीच टीका प्रसिद्ध झाल्यावर निषेध करणाऱ्यांना सोडून देण्यात यायचं.



या साऱ्या घडामोडींच्या दरम्यान कस्तुरबा एकट्या फार्मची व्यवस्था पाहायच्या. त्यांना आता चार मुले होती. हरिलाल, मणिलाल, रामदास आणि देवदास. फक्त ख्रिश्चन लग्न हीच कायदेशीर मानली जातील, हा सरकारचा नवा कायदा आला. आता निषेध करणं तर अटळच होतं. कस्तुरबा चांगल्याच रागावल्या होत्या. त्यांनी पद्धतशीर धार्मिक विधींनी लग्न केलं होतं. आणि आता हे गोरे लोक सांगत होते की ते लग्न कायदेशीर नव्हे म्हणून? आता त्या आणि त्यांच्या मैत्रिणी या कायद्याच्या विरोधात निषेध मोर्चा काढणार होत्या.


या वेळी हा मोठाच सत्याग्रह झाला. हजारो स्त्री-पुरुषांनी या निषेध-मोर्चात भाग घेतला आणि ते पोलिसांच्या लाठीहल्ल्याला सामोरे गेले. काही जण त्यात मेलेही.
ट्रान्सवाल भागातील महिलांच्या मोर्चाचे नेतृत्व कस्तुरबांनी केलं. त्यांना अटक करून तुरुंगात पाठवण्यात आलं. त्यांना अट्टल गुन्हेगारांच्याबरोबर अत्यंत घाणेरड्या कोठडीत तब्बल तीन महिने ठेवण्यात आलं. त्यांना सोडल्यावर त्या बऱ्याच आजारी पडल्या. अखेर शेवटी तो कायदा मागे घेण्यात आला.



कस्तुरबा आता स्वातंत्र्य सैनिक बनल्या होत्या.
१९१५ मध्ये गांधी कुटुंब भारताकडे परत निघालं.
अधिक मोठ्या आव्हानांसाठी आणि अधिक मोठ्या लढ्यासाठी.

# गांधी फॅशन

गांधीजी सतत आपल्या आयुष्यात प्रयोग करत होते. त्यांनी आपले कपडेही सतत बदलले. त्यांच्या छायाचित्रांचा अभ्यास केला तर गांधी कुटुंबाने कोणकोणत्या फॅशन वेळोवेळी स्वीकारल्या हे आपल्या लक्षात येईल. लंडनमध्ये ते सूट घालत होते, फॅन्सी नेकटाय आणि डोक्यावर हॅट. भारतात परत आल्यावर त्यांनी कस्तुरबा आणि मुलांना भरपूर चालण्याचा व्यायाम करण्याचा आग्रह धरला, ओटमिलची खीर आणि कोकोआ ही त्यांची सकाळची न्याहरी असली पाहिजे आणि बूट-मोजे घातले पाहिजेत असा गांधीजींचा दंडक होता. कालांतराने कुटुंबीयांनी मोज्यांमुळे पावलांना वास येतो म्हणून मोजे घालायला स्पष्ट नकार दिला.



दक्षिण आफ्रिकेत ते सुरुवातीला पाश्चात्त्य पोशाख घालत असत आणि कस्तुरबा पारशी पद्धतीच्या साड्या घालत. भारतात परत आल्यानंतर त्यांनी भारतीय शेतकऱ्याप्रमाणे धोतर, कुडता आणि डोक्यावरून अगदी ओघळणारं भलं मोठ्ठं पागोटं असा पोशाख करायचं ठरवलं. कस्तुरबा साधी सुती साडी या काळात घालत होत्या.

त्यांच्यासारख्या सुंदर स्त्रीला छान छान कपडे आणि दागिने सोडणं ही सोपी गोष्ट नव्हती. कदाचित म्हणूनच एकाही फोटोत त्यांचा चेहरा हसताना दिसत नसावा.

## घरी परतले

अखेर कस्तुरबा घरी आल्या. पण त्यांना कल्पना होती की स्वातंत्र्य संग्रामात उडी घ्यायची, या हेतूनेच गांधीजी भारतात परतलेले होते. त्यामुळे आता कस्तुरबांनी अधिक कष्ट करण्याची आणि संकटं झेलण्याची तयारी करूनच ठेवलेली होती. गांधीजींच्या, दक्षिण आफ्रिकेतील कामगिरीच्या बातम्या भारतात आलेल्या होत्या आणि गांधीजींचं मुंबईच्या बंदरावर जंगी स्वागत झालं. हार घालून त्यांचं स्वागत करण्यात आलं, त्यांची मिरवणूक काढण्यात आली आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने त्यांच्या सन्मानार्थ मोठा स्वागत-समारंभ आयोजित केला. या स्वागत-समारंभाला मुंबईतील उच्चभ्रू लोक हजर होते. रेशमी झुळझुळीत साड्या आणि दागिने घातलेल्या बायकांच्या गराड्यात कस्तुरबा हातमागावरील सुती साडी घालून ताठपणे आपल्या पतीच्या शेजारी उभ्या होत्या. आता भविष्यात काय घडणार आहे, याची त्या जणू वाट पाहत होत्या.

गांधीजी भारतापासून जवळजवळ वीस वर्षं दूर राहिलेले होते. काँग्रेस नेते गोपाळ कृष्ण गोखले यांनी त्यांना पहिल्यांदा देश समजावून घ्यायला सांगितला. तेव्हा त्यांनी आपल्या देशाचा शोध घेण्यासाठी रेल्वेने मोठा प्रवास सुरू केला. या प्रवासात त्यांना कस्तुरबांची साथ होती. ते गर्दीच्या आणि घाणेरड्या अशा तृतीय श्रेणीच्या डब्यातून प्रवास करत होते. कस्तुरबांना हे सारं अवघड वाटत होतं पण त्याचबरोबर गरीब लोक ते जातील तिथे त्यांचे ज्या प्रेमाने स्वागत करत होते, ते पाहून त्या थक्क होत होत्या. या साध्या लोकांना फक्त एवढंच समजत होतं की त्यांचं ऐकून घ्यायला तयार असणारा हा नेता आहे, त्यांच्यासाठी लढा उभारणारा हा नेता आहे, त्यांच्या बाजूचा हा नेता आहे. गांधीजी आता ‘महात्मा’ बनण्याचा प्रवास सुरू झाला होता आणि आता ते लोकांचे लाडके बापू झाले होते आणि कस्तुरबा ‘बा’.



शेकडोंच्या संख्येने लोक त्यांची वाट पाहत रेल्वे स्टेशनवर उभे राहत आणि त्यांचा डबा फुलांनी आणि फळांनी नुसता भरून टाकत. शांतिनिकेतनात रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांचं संगीत आणि नृत्य यांनी स्वागत केलं.

बागा आणि आमराया असलेल्या या परिसरात राहणं कस्तुरबांना मनापासून आवडलं. तिथे विद्यार्थ्यांचे वर्ग झाडाखाली घेतले जायचे. कस्तुरबांना हे पाहून आपल्या टॉलस्टॉय फार्मची आठवण आली असेल.

गांधीजींनी आता अहमदाबादजवळ साबरमती आश्रम सुरू केला आणि कस्तुरबांना घर मिळालं. अनेक जण आश्रमात राहायला आले. आश्रमाची स्वत:ची शाळा होती. ग्रंथालय होतं, ते तिथे भाजीपाल्याची लागवड करत आणि फळांचं उत्पादन करीत. गाईंचे गोठे होते. ते सर्वजण चरख्यावर सूत कातीत आणि विणकर त्या सुतापासून साड्या आणि धोतरे बनवत असत.



कस्तुरबा आणि काही बायका स्वयंपाकघराची देखभाल करत. गांधीजी बऱ्याचदा बाहेर असत आणि स्वातंत्र्य लढ्यातील कामामुळे दमलेल्या गांधीजींची साबरमती ही विश्रांतीची जागा असे. तिथे त्यांची काळजी घेण्यासाठी कस्तुरबा असत आणि गांधीजींना पुन्हा ताजंतवानं होण्याला त्या मदत करत असत.

अमेरिकन पत्रकार लुई फिशर यांनी गांधीजींचं फार चांगलं चरित्र लिहिलं आहे. कस्तुरबांना त्यांनी साबरमतीला पाहिलं. त्यांनी लिहिलं आहे, ‘जेवणाच्या आणि प्रार्थनेच्या वेळी त्या गांधीजींच्या डाव्या खांद्यांच्या किंचित मागे बसून त्यांना प्रेमाने वारा घालत असत. त्या कायम त्यांच्याकडे पाहत असत, पण ते कस्तुरबांकडे क्वचितच पाहायचे. पण तरीही त्या जवळ असाव्यात असं त्यांना वाटायचं. त्या दृष्टीने दोघांच्यात एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती होती.’

गांधीजींचे अनेक नियम त्या मोडत असत. गांधीजींना मुलांनी कमी मसाल्याच्या बेचव आणि कंटाळवाण्या आहारावर राहावे असे वाटत असे. तर कस्तुरबा आश्रमातल्या लहान मुलांना कायम मिठाई खाऊ घालीत. औषधाबाबतही गांधीजींची चमत्कारिक मतं होती. चार वर्षांचा नातू अरुण तापाने फणफणला तेव्हा त्याला सात दिवस काहीही खायला घालायचं नाही, असं गांधीजींनी सांगितलं. लवकरच त्याचा ताप गेला आणि ते छोटं पोर खाण्यासाठी रडू लागलं. कस्तुरबांनी पतीकडे एक नजर टाकली आणि त्या निश्चयाने म्हणाल्या, ‘मी या पोराची उपासमार होऊ देणार नाही.’ आणि त्यांनी रडणाऱ्या अरुणला लगेचच संत्र्याचा रस पाजला.

वर्षांनुर्षं निषेध मोर्चाचं नेतृत्व करून आणि तुरुंगात जाऊन कस्तुरबा कमालीच्या स्वावलंबी बनलेल्या होत्या. एकदा त्या बऱ्याच आजारी असताना त्यांच्या डॉक्टरांना - सुशीला नायर यांना भेटण्यासाठी एकट्याच रेल्वेनं गेल्या. रेल्वे स्टेशनवर कस्तुरबा एकट्याच आलेल्या पाहून डॉक्टर नायर यांना धक्का बसला. त्यांनी तसं बोलूनही दाखवलं. तेव्हा कस्तुरबा हसल्या आणि म्हणाल्या, 'त्यात काय बिघडलं? त्यांनी मला निघताना गाडीच्या डब्यात बसवून दिलं. बाजूच्या प्रवाशांना माझी काळजी घ्यायला सांगितली. आणि इथं तुम्ही मला न्यायला आलात.'



गांधीजी आणि कस्तुरबा बिहारमधल्या चंपारण्य येथे जोडीने गेले. तिथले गोरे लोक निळीच्या शेतकऱ्यांचं शोषण करत होते, त्यांची लुबाडणूक करत होते. गांधीजींनी त्यांच्यासाठी सत्याग्रहाचा मार्ग अवलंबायचं ठरवलं. ते खेडोपाडी जाऊन लोकांशी बोलायचे. त्या दरम्यान त्यांच्या जिवालाही धोका होता. कस्तुरबा खेड्यातील बायकांशी बोलायच्या. त्यांना खेड्यातील टोकाचं दारिद्य्र पाहून धक्काच बसला. कस्तुरबा तशा व्यवहारी स्त्री होत्या. त्या तिथल्या बायकांना स्वच्छतेची, पोषक आहाराची गरज समजावून द्यायच्या, त्याचप्रमाणे मुलांना शिकवण्याचे काय फायदे आहेत, तेही समजावून द्यायच्या.

कस्तुरबा या तशा पारंपरिक स्त्री होत्या. हिंदू धर्मातील चालीरीतींवर त्यांचा विश्वास होता. त्यामुळेच त्यांचा जातिव्यवस्थेवरही विश्वास होता. त्याच वेळी गांधीजी हे जातिव्यवस्थेच्या आणि अस्पृश्यतेच्या विरुद्ध लढा देत होते. या गोष्टी मानवतेविरुद्ध आहेत, हे त्यांना ठाऊक होतं. जेव्हा गांधीजींनी दुदाभाई आणि त्यांची बायको दानीबेन या हरिजन जोडप्याला त्यांची मुलगी लक्ष्मी हिच्यासकट आश्रमात राहायला बोलावलं तेव्हा कस्तुरबांनी दानीबेनना आश्रमाच्या स्वयंपाकघरात प्रवेश करायला विरोध केला. आश्रमातल्या अनेक लोकांनी - त्यात गांधीजींचे पुतणे मगनलालही होते - या मुद्द्यावरून आश्रम सोडला. कस्तुरबांची समजूत पटवायला गांधीजींना थोडा वेळ लागला. लक्ष्मीला दत्तक घेण्याची कल्पना गांधीजींनी कस्तुरबांना सांगितली तोपर्यंत कस्तुरबांचा विरोध मावळलेला होता.

# कस्तुरबांचं कुटुंब

गांधीजी हे वडील म्हणून अत्यंत कडक होते आणि मुलांबाबत ते कठोर शिस्तीचे होते. मुलांना घरीच शिक्षण द्यावं, असा गांधीजींचा आग्रह होता. मुलांना अत्यंत साधं आणि शिस्तीचं जीवन जगावं लागे. त्यांचा थोरला मुलगा हरिलाल याला हे नियम मान्य नव्हते. त्या कारणाने तो कुटुंबापासून दुरावला. कस्तुरबाना हे सहन करणं फार अवघड गेलं. बिचारीचं हृदय पिळवटून निघालं.
हरिलाल फार त्रासदायक आयुष्य जगला. तो वडिलांवर जाहीर टीका करत असे. त्याला परत कुटुंबात आणण्याचा कस्तुरबांनी प्रयत्न केला पण त्यांना यश आलं नाही. जेव्हा हरिलालची बायको वारली तेव्हा कस्तुरबांनी त्याच्या मुलांना साबरमती आश्रमात आणलं आणि वाढवलं. गांधीजींना आपल्या मुलांनी राजकारणात यावं असं वाटत नव्हतं, त्यामुळे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर एकाही मुलानं राजकारणात पाऊल टाकलं नाही.

१९३० च्या हिवाळ्यात गांधीजी आणि त्यांचे अनुयायी दांडी यात्रेच्या तयारीला लागले. मोठ्या हुशारीने सारी योजना आखलेली होती. सरकारचा मिठाचा कायदा म्हणत होता की कोणत्याही भारतीय माणसाला मीठ तयार करण्याची किंवा ते विकण्याची परवानगी नाही. परंतु या मिठावरचा कर मात्र गरिबातल्या गरीब माणसालाही भरावा लागत होता. ते साबरमती ते दांडीचा समुद्र किनारा अशी यात्रा काढणार होते. समुद्र किनाऱ्यावर मीठ उचलणार होते आणि ते विकणार होते.

गांधीजी अठ्ठ्याहत्तर तरुणांना घेऊन पंचवीस दिवसांच्या दांडी यात्रेला निघाले. वाटेतल्या खेड्यांमध्ये ते थांबत होते. दांडीयात्रेच्या काळातच सर्व भारतातल्या लोकांनी मीठ उचलून आणि ते विकून हा मिठाचा कायदा मोडला. हजारोंना अटक झाली तेव्हा बाजारपेठा, कोर्ट, शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयं उत्स्फूर्तपणे बंद झाली आणि देशाचा कारभार ठप्प झाला. तो खरा सत्याग्रह होता. शांततापूर्ण, अहिंसक मार्गाने निषेध नोंदवण्याचा आणि ब्रिटिश सरकारला आपलं म्हणणं ऐकायला लावण्याचा फार हुशारीने आखलेला तो मार्ग होता.

पदयात्रेत सहभागी झालेल्यांच्या जिवाला धोका होता. त्यांना मारहाण व्हायची, गोळ्या घातल्या जायच्या किंवा तुरुंगात डांबलं जायचं. कस्तुरबांना हे ठाऊक होतं. २० मार्च १९३० ला पदयात्रेतल्या लोकांनी साबरमती सोडलं, तेव्हा त्यांना बरोबर कस्तुरबा येत आहेत, हे लक्षात आलं. पहिल्या मुक्कामाला पदयात्रा थांबलेली असताना गांधीजींनी कस्तुरबांना परत जाण्याची विनंती केली. कस्तुरबांची जागा नेहमीच पतीच्या खांद्याला खांदा लावून होती आणि आता वयाच्या साठीत आल्यावर ना त्यांना आठवडेच्या आठवडे खडबडीत रस्त्यावरून पायी चालण्याची भीती वाटत होती ना पोलिशी लाठीमाराची. पदयात्रेनंतर गांधीजींना तुरुंगात पाठवण्यात आलं आणि कस्तुरबा रुग्णालयात जखमी होऊन पडलेल्या स्वयंसेवकांना भेटायला जाऊ लागल्या.

१९४२ साली काँग्रेस पक्षाने ब्रिटिशांना 'भारत छोडो' सांगण्याचा ठराव पास केला. एका रात्रीत सर्व काँग्रेस नेत्यांची धरपकड झाली आणि त्यांना तुरुंगात टाकण्यात आलं. गांधीजींना पुण्याजवळील आगाखान पॅलेसमध्ये नेण्यात आलं. कस्तुरबांनी सरकारला गांधीजींबरोबर राहू देण्याची विनंती केली. जेव्हा कस्तुरबांना नकार देण्यात आला तेव्हा त्यांनी 'आपण जाहीर सभेत याविरुद्ध आवाज उठवू आणि पदयात्रा काढू' अशी धमकी दिली. मग त्यांना गांधीजींबरोबर राहण्याची परवानगी देण्यात आली.

कस्तुरबा आणि गांधीजी दोन वर्षं तुरुंगात होते. त्यांच्याबरोबर गांधीजींचे सचिव महादेव देसाई, सरोजिनी नायडू, मीरा बहन यांच्यासारखे नेतेही होते. आपल्या कुटुंबापासून वेगळं राहायला कस्तुरबांना फार अवघड जात होतं. विशेषत: नातवंडांची कस्तुरबांना सारखी आठवण येत असे. गांधीजींनी याबाबतीत काही करावं असं त्यांना वाटे. एकदा त्यांनी गांधीजींना विचारलं, ''तुम्ही ब्रिटिशांना भारत सोडायला का सांगत आहात? आपला देश विस्तीर्ण आहे, मोठा आहे, आपण सारे तिथं राहूया. त्यांना इथं राहायचं असल्यास राहू द्यावं.''



ते बांशी सहमत होत म्हणाले, ‘‘इंग्रज भारतात एका मुक्त देशाचे नागरिक
म्हणून राहणार असतील तर त्यांची काहीच हरकत नाही.’’
ते बागेत दूरवर फिरायला जात असत. ते दोघेही आता म्हातारे झाले होते.
पण तरीही गांधीजींचा कस्तुरबांना शिकवण्याचा उत्साह काही कमी झाला नव्हता.
ते कस्तुरबांना भूगोल शिकवायचा प्रयत्न करायचे आणि
बांनी देश आणि त्याच्या राजधान्या घडाघडा म्हणून दाखवाव्यात,
असं त्यांना वाटायचं. कस्तुरबांना काही ते जमत नसे आणि
देश आणि राजधानी याचा कायम त्या घोटाळा करत असत.

आगाखान पॅलेसमधील वास्तव्याचा काळ गांधीजींसाठी फार दु:खद काळ ठरला. पहिल्यांदा त्यांचे जुने मित्र आणि सहकारी महादेव देसाई वारले आणि नंतर १९४४ मध्ये कस्तुरबा फुफ्फुसाच्या संसर्गानं गंभीर आजारी पडल्या. खूप प्रकारचे उपाय करून झाले, पण कशाचाही गुण आला नाही. त्यांच्या मुलांना त्यांना भेटण्याची परवानगी देण्यात आली. गांधीजी सारा वेळ बांच्या उशाला बसून असत. तिची शुश्रूषा करीत, तिच्यासाठी प्रार्थना म्हणत. २२ फेब्रुवारी, १९४४ ला कस्तुरबांनी गांधीजींच्या मांडीवर प्राण सोडला. बांच्या अंतिम इच्छेनुसार गांधीजींनी काढलेल्या सुतापासून बनवलेल्या साडीमध्ये त्यांना चितेवर ठेवण्यात आलं.

बांच्या मृत्यूतून सावरायला गांधीजींना बराच काळ जावा लागला. बासष्ट वर्षांचं त्यांचं सहजीवन होतं. मीरा बहनने पत्रात लिहिल्याप्रमाणे ‘बांच्या जाण्याने बापूंचा स्वत:चाच भाग तुटून पडल्यासारखा झाला.’ कस्तुरबांनी एवढे लढे दिले, त्याग केला पण भारताला स्वातंत्र्य मिळाल्याचं त्यांना पाहायला मिळालं नाही, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट म्हटली पाहिजे.

आगाखान पॅलेसच्या आवारात आपल्या स्वातंत्र्य संग्रामात हुतात्मा झालेल्या दोघांच्या समाध्या आहेत. महात्मा गांधींना अत्यंत जवळच्या असणाऱ्या या दोन व्यक्ती - एक म्हणजे महादेव देसाई आणि दुसऱ्या कस्तुरबा गांधी.



This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Story Attribution:

This story: आमची बा is translated by Mukund Taksale . The © for this translation lies with Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Based on Original story: 'We call her Ba - A Biography of Kasturba Gandhi', by Subhadra Sen Gupta . © Pratham Books , 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

## Other Credits:

'Aamchi Ba – Kasturba Gandhi Yanche Jeevan-charitra' has been published on StoryWeaver by Pratham Books. The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts. www.prathambooks.org

## Images Attributions:

Cover page: Kasturba Gandhi, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 2: A coconut tree, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 3: Kasturba Gandhi in a sari, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 6: A woman scolding a man in front of children, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 8: Child marriage, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 9: A child groom sitting in a corner, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 11: Plain background, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 12: Food in plate and bowls, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 14: Tea cups and a kettle, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 16: Five people in an alley, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts.

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

## Images Attributions:

Page 18: A man standing with folded arms, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 19: Plain background, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 20: Tension between a man and a woman, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 21: A window, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 23: Mahatma Gandhi walking, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 25: Kasturba Gandhi's sketch, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 27: An upset woman, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 29: Two people being welcomed with garlands in a train compartment, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 30: A girl selling wares, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 32: A woman spinning the charkha, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 35: Yellow background, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 37: Plain green background, by Chaaya Prabhat © Ms Moochie Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts.

This book was made possible by Pratham Books' StoryWeaver platform. Content under Creative Commons licenses can be downloaded, translated and can even be used to create new stories - provided you give appropriate credit, and indicate if changes were made. To know more about this, and the full terms of use and attribution, please visit the following link.

Images Attributions:

Page 38: Kasturba Gandhi and Mahatma Gandhi walking together, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license. Page 40: Kasturba and Mahatma Gandhi walking together, by Neeta Gangopadhya © Pratham Books, 2014. Some rights reserved. Released under CC BY 4.0 license.

Disclaimer: https://www.storyweaver.org.in/terms_and_conditions

Some rights reserved. This book is CC-BY-4.0 licensed. You can copy, modify, distribute and perform the work, even for commercial purposes, all without asking permission. For full terms of use and attribution, http://creativecommons.org/licenses/by/4.0/

The development of this book has been supported by Parag (Promoting Innovative Publishing in Education), an initiative of Tata Trusts.

# आमची बा

(Marathi)

स्वत:ची अशी वेगळी ओळख असणाऱ्या, अंगी विलक्षण धैर्य आणि प्रचंड इच्छाशक्ती असणाऱ्या आणि देशासाठी पराकोटीचा त्याग केलेल्या कस्तुरबा या असामान्य कोटीतल्या स्त्री होत्या. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या त्या मित्रही होत्या आणि सोबतीही. लुई फिशरने त्यांच्याबद्दल लिहिलेलं आहे, ‘एका वेळी स्वत:च्या व्यक्तित्वाचं भान असणं आणि त्याच वेळी एका महात्म्याची सावली असणं हे त्यांना एक वेगळीच वैशिष्ट्यपूर्ण स्त्री बनवून गेलं.’ देशाच्या वादळी संघर्षाच्या काळात जगातल्या अनेक मोठ्या नेत्यांच्या खांद्याला खांदा लावून त्या चालल्या. एका वेगळ्या स्त्रीची ही कहाणी तुम्हाला वाचायला नक्की आवडेल.

या पुस्तकाची वाचन पातळी ४ आहे. आत्मविश्वासाने, ओघवते वाचन करणाऱ्या मुलांसाठी.


PRATHAM BOOKS storyweaver

Pratham Books goes digital to weave a whole new chapter in the realm of multilingual children's stories. Knitting together children, authors, illustrators and publishers. Folding in teachers, and translators. To create a rich fabric of openly licensed multilingual stories for the children of India  and the world. Our unique online platform, StoryWeaver, is a playground where children, parents, teachers and librarians can get creative. Come, start weaving today, and help us get a book in every child's hand!